उच्च माध्यमिक स्तरावरील इतिहास विषयातून विकसित होणारे सामाजिक कौशल्य व सामाजिक भान यांचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीकरिता सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

अंकुश बाबासाहेब सिताराम

मार्गदर्शक

डॉ. गायकवाड गौतम रामचंद्र

संशोधन केंद्र

शिक्षण शास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

2021

अनुक्रमणिका

1. प्रस्तावना
2. संशोधनाची गरज व महत्व
3. समस्येचे विधान
4. कार्यात्मक व्याख्या
5. संशोधनाची उदिष्टे
6. गृहीतक
7. व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा
8. परिकल्पना
9. संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा
10. संशोधन पद्धती
11. जनसंख्या
12. नमुना
13. माहिती संकलनाची व विश्लेषणाची साधने
14. प्रकरण योजना
15. कालावधी
16. संदर्भ ग्रंथ सुची

1. प्रस्तावना :–

प्रत्येकाच्या जीवनाला कलाटणी देणारा काळ हा उच्च माध्यमिक स्तर असतो. विद्यार्थीदशा व भविष्यात संपादन करणारी नौकरी अथवा व्यवसाय यामधील दुवा म्हणून या शिक्षणाकडे पाहता येते. येथूनच एक सुजाण नागरिक बनण्याचा प्रवास सुरु होतो. या स्तरात मुलाचे रुपांतर पुरुषात व मुलीचे रुपांतर स्त्री मध्ये होवू लागते. उच्च माध्यमिक शिक्षणात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांसमोर अनेक पर्याय असतात. आयटीआय, किमान कौशल्य, कला, वाणिज्य, विज्ञान..... अशा विविध शाखेमधून विद्धयार्थी प्रवेश घेतो, समजा शास्त्र शाखेमध्ये प्रवेश घेतेवेळी आपण वैद्यकीय शास्त्राची आवड असेल तर गणित विषय टाळून जीवशास्त्र विषयाच्या गटाची निवड केली जाऊ शकते. अशा प्रकारे भविष्याकडे वाटचाल चालू होते. विद्यार्थी किती प्रमाणात यशस्वी होतो याचे उत्तर त्यांनी केलेल्या परिश्रमातून मिळते. माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतेवेळी बहुतांश वेळा पालक प्रवेशाबाबतचा निर्णय स्वतः घेतात. येथूनच विद्यार्थ्यांच्या शिक्षण व करिअरबाबत पेच निर्माण होऊ लागतो. शालेय जीवन असो की, कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक.....कोणत्याही क्षेत्रात स्पर्धा असतेच. यातूनच विद्धयार्थी घडत जातो. परंतु या शिक्षण पद्धतीतून विद्यार्थी यशस्वी होतो का? यशस्वीतेचा विचार नेमक्या कोणत्या परीमाणातून मोजावे, हा पण प्रश्न आहे. विद्धयार्थी वैद्यकीय शिक्षण घेवून डॉक्टर झाला तर यशस्वी म्हणावे का ? डॉक्टर झाल्यानंतर आई वडिलांना बोलत नसेल, स्वतःच्याच विश्वात रमत असेल, नातलगांचा विचार करत नसेल, मित्रांना बोलणे सोडून फक्त संबंधित क्षेत्रातील डॉक्टर अथवा कर्मचारीवर्ग एवढेच क्षेत्र मर्यादित ठेवून जीवन जगत असेल तर असा विद्यार्थी यशस्वी झाला असे मानता येईल का? अश्या तथाकथित यशस्वी व्यक्तीची समाजासाठीची उपयुक्तता काय असेल? आपण नेहमी म्हणतो विद्यार्थी जेव्हा शिक्षण घेतो तेव्हा जीवन जगत नाही आणि जेव्हा जीवन जगायला सुरुवात करतो तेव्हा शिक्षण संपलेले असते. अशी आपली शिक्षण पद्धती आहे. म्हणून जीवन व शिक्षण यात जास्त अंतर नसावे. पण जीवन व शिक्षण यांचा मेळ नेमका कसा लावायचा हा प्रश्न निर्माण होतो. या उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जर योग्य वळण लावलं, योग्य वेळी योग्य दिशा दाखविली तर त्यांची सामाजिक प्रगती होवू शकते. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजासाठी आपण काही तरी केले पाहिजे ही जाणीव निर्माण झाली पाहिजे. केवळ जाणीव होवून थांबता येणार नाही तर सामाजिक बनण्यासाठी आपण काही सामाजिक कौशल्य अंगिकारली पाहिजेत. या भावनेतून इतिहास अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्याचा सामाजिक विकास साधने अपेक्षित आहे. यामुळेच सामाजिक कौशल्य व सामाजिक भानासाठी कार्यक्रम आखून त्याची परिणामकारकता अभ्यासण्याच्या हेतूने सदर विषयाची निवड करण्यात आली आहे.

2. संशोधनाची गरज व महत्व :–

संशोधनाची गरज –

अ) उच्च माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांमधील सामाजिक कौशल्य व सामाजिक भानच्या सद्यस्थितीची माहिती मिळेल.

आ) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना सामाजिक कौशल्य व सामाजिक भानची माहिती देता होईल.

इ) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना सामाजिक कौशल्य व सामाजिक भानसाठी कृतीकार्यक्रम तयार करता येईल.

संशोधनाचे महत्व

अ) उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना सामाजिक कौशल्य व सामाजिक भानाबाबत स्वतःची स्थिती समजेल.

आ)सामाजिक कौशल्य व सामाजिक भानाबाबत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण होईल.

इ) सामाजिक विकास साधायला मदत मिळेल.

ई) उच्च माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात सामाजिक कौशल्य व सामाजिक भान आवश्यक घटकांचा समावेश करता येईल.

यामुळे संशोधकाने सदरील संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

3. समस्येचे विधान :–

उच्च माध्यमिक स्तरावरील इतिहास विषयातून विकसित होणारे सामाजिक कौशल्य व सामाजिक भान यांचा अभ्यास

4. कार्यात्मक व्याख्या :–

उच्च माध्यमिक स्तर– लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील मराठी माध्यमाच्या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या इयत्ता अकरावी या वर्गाचा समावेश आहे. यास उच्च माध्यमिक स्तर असे म्हटले आहे.

सामाजिक कौशल्य :– समाजातील स्वतःचे अस्तित्व समजून घेवून समाजात मिळून मिसळून राहण्यासाठी आवश्यक कृतियुक्त सहभागी होण्याचे कसब म्हणजे सामाजिक कौशल्य होय.

सामाजिक भान:– समाजात मिळून मिसळून राहण्याची जाणीवजागृती होणे म्हणजे सामाजिक भान होय.

5. संशोधनाची उदिष्टे :–

सदरील संशोधनामध्ये संशोधक खालील उद्दिष्टांनुसार संशोधन करणार आहे.

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील सामाजिक कौशल्य व सामाजिक भानच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२. सामाजिक कौशल्य व सामाजिक भानच्या विकासासाठी कृतीकार्यक्रम राबविणे.

३. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या कृतीकार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे.

४. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक भानाचा व सामाजिक जाणीवेचा अभ्यास करणे.

५. ग्रामीण व शहरी या स्तरानुसार उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक भान व सामाजिक जाणीवेचा अभ्यास करणे.

६. स्त्री व पुरुष या स्तरानुसार उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक भान व सामाजिक जाणीवेचा अभ्यास करणे.

6. गृहीतक :–

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना सामाजिक कौशल्ये व सामाजिक भान असते.

(Training in social awareness, awareness of social problem, Ph.D.(Edu.), Savitribai Phule Pune University,1998)

7. व्याप्ती व मर्यादा :–

संशोधनाची व्याप्ती

अ) क्षेत्रव्याप्ती :– प्रस्तुत संशोधन लातूर जिल्हयापुरते व्यापक आहे.

आ) आशय व्याप्ती :– प्रस्तुत संशोधन हे उच्च माध्यमिक शाळेतील इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांपुरते व्यापक आहे.

इ) घटक व्याप्ती :– प्रस्तुत संशोधन हे उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक कौशल्याचा व सामाजिक भानचा अभ्यास करण्याइतके आहे.

ई) कालव्याप्ती :– प्रस्तुत संशोधन 2021 ते 2024 या दरम्यान पुर्ण केले जाईल.

संशोधनाची मर्यादा :–

अ) क्षेत्रमर्यादा :– प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्हयापुरतेच मर्यादित आहे.

आ) आशय मर्यादा :– प्रस्तुत संशोधन हे इयत्ता अकरावी विद्यार्थ्यांपुरते मर्यादित आहे.

इ) घटक मर्यादा :– प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक कौशल्याचा व सामाजिक भानाचा अभ्यास करण्यापुरते मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतीसादकानी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून असतील.

परिमर्यादा :– प्रस्तुत संशोधन हे पुढील घटकांसाठी परीमर्यादित आहे.

अ. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्र राज्यातील जळकोट तालुक्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित असतील.

ब. प्रस्तुत संशोधनात सामाजिक कौशल्याचा व सामाजिक भानाचा अभ्यास अपेक्षित असेल.

8. संशोधन परिकल्पना व शून्य परिकल्पना :–

संशोधन परिकल्पना

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कौशल्य व सामाजिक भानाचा कार्यक्रम राबवल्यानंतर सामाजिक कौशल्य व सामाजिक भानामध्ये लक्षणीय परिणाम आढळतो.

शून्य परिकल्पना –

२. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कौशल्य व सामाजिक भानाचा कार्यक्रम राबवल्यानंतर सामाजिक कौशल्य व सामाजिक भानामध्ये विशेष फरक पडत नाही.

9. संबंधित संशोधनाचा आढावा

9.1 Khateek, Chhitar Mal, A study of awareness of senior secondary level students towards life skill education, Maharaja Ganga Singh University,Ph.D. 2016

उच्च माध्यमिक शाळेतील विद्ध्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्यांच्या प्रती जागरुकता निर्माण करणे. व उच्च माध्यमिक शाळेतील विद्ध्यार्थ्यांमध्ये लिंगभेदानुसार जीवन कौशल्यांच्या प्रती जागरुकता निर्माण करणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पाच बिंदू वर आधारित जीवन कौशल्य मापिका प्रमाणीकरणाच्या पायरयाचा अवलंब करून विकसित केली. त्यानुसार उच्च माध्यमिक शाळेतील विद्ध्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांच्या प्रती जागरुकता दिसून आली.उच्च माध्यमिक शाळेतील विद्ध्यार्थ्यांमध्ये लिंगभेदानुसार जीवन कौशल्यांच्या प्रती जागरुकतेमध्ये विशेष फरक नाही. हे **निष्कर्ष** होते.

9.2 Lavalekar, Anagha, Training in social awareness, awareness of social problem, Ph.D.(Edu.), Savitribai Phule Pune University,1998.

या पूर्व संशोधनानुसार इयत्ता आठवीच्या विद्ध्यार्थ्यांसाठी सामाजिक जाणीवेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामाजिक समस्येबाबत अभिवृत्ती मापिका, पूर्व चाचणी व उत्तर चाचणी ही साधने वापरण्यात आली. प्रयोगानंतर नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यामध्ये सामाजिक जाणीव अधिक दिसून आली, असा **निष्कर्ष** दिसून आला.

10.संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पद्धतीमधील **सर्वेक्षण पद्धती** व **प्रायोगिक संशोधन पध्दती** वापरली जाईल. ज्यामध्ये प्रथम समस्या निश्चिती केली जाते, सामाजिक कौशल्य व सामाजिक भानाचे आवश्यक घटक शोधणे व सद्यस्थितीच्या अभ्यासातून प्रयोग निश्चित करणे, अभिकल्प ठरवणे, पूर्व चाचणी व अंतिम चाचणीच्या माध्यमातून परिकल्पनांची उकल व निष्कर्ष काढल्यानंतर अहवाल लेखन केले जाईल.

11. जनसंख्या :-

प्रस्तुत संशोधनासाठी जनसंख्या म्हणून महाराष्ट राज्यातील उच्च माध्यमिक स्तरात शिकणारे लातूर जिल्हयातील इयत्ता अकरावीचे विद्यार्थी असतील.

12. नमुना :-

सर्वेक्षणासाठी लातूर जिल्ह्यात माध्यमिक स्तरावरील शाळांमधून सुगम यादृच्छिक निवड पद्धतीने (इयत्ता अकरावीचे) 1000 विद्यार्थी यांची संशोधक नमुना म्हणून निवड करणार आहे. तर प्रयोगासाठी जळकोट तालुक्यातील उच्च माध्यमिक शाळेतील इयत्ता अकरावीच्या 100 विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. ज्यापैकी 50 विद्यार्थी प्रायोगिक गटात तर 50 विद्यार्थी नियंत्रित गटात असतील.

13. माहिती संकलनाची व विश्लेषणाची साधने :-

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा सामाजिक कौशल्य व सामाजिक भानाची सद्यस्थिती अभ्यासण्यासाठी प्रश्नावली तयार केली जाईल तसेच पूर्व चाचणी व उत्तर चाचणी तयार केली जाईल. शेकडेवारी, मध्यमान, मध्यांक, बहुलक, प्रमाण विचलन, क्रांतिक अंक अशा साधनांचा उपयोग करण्यात येईल.

14. प्रकरण योजना :–

१.प्रस्तावना

२. संबधित संशोधनाचा आढावा

३. संशोधन पद्धती

४ . माहितीचे अर्थनिर्वचन

५. सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

15. कालावधी :–

अ.क्र	संशोधन कार्य	कालावधी
१.	पूर्व संशोधनाचा आढावा	जुलै–२१ ते डिसेंबर–२१
२.	संशोधन विषय निश्चिती	जानेवारी–२२ ते जून–२२
३.	साधन विकसन	जुलै–२२ ते डिसेंबर –२३
४.	माहितीचे अर्थ निर्वचन	जानेवारी–२४ ते जून–२४
५.	अहवाल लेखन व सादरीकरण	जुलै–२४ ते डिसेंबर– २४

16. संदर्भग्रंथ सुची :–

- अनिता पाटील, (2008) मानसशास्त्रीय चाचण्या, डायमंड प्रकाशन, पुणे
- आर्य आर . पी . काणकिया मनुभाई, नांद्रेकर भ. रा., नवनीत शालेय ॲटलास (मराठी आवृत्ती), नवनीत पब्लिकेशन्स (इं) लि. दादर, मुंबई.
- एकनाथ गावंडे, गावंडे अमित, (2006) मूल्याधिष्ठित शिक्षण प्रक्रिया आणि उपचार, नित्य नूतन प्रकाशन, कोल्हापूर
- कठारे डॉ अनिल ,(२००१) प्राचीन भारत , कल्पना प्रकाशन , नांदेड.
- कुंडले म.बा. , (१९८५) अध्यापन शास्त्र आणि पद्धती , व्हीनस प्रकाशन , पुणे .
- कुलकर्णी एम.जी. ,(१९७५) भारतीय समाजव्यवस्था , परिमल प्रकाशन , औरंगाबाद.
- गद्रे गीता , गद्रे ल. रा., (१९८४) शिक्षणाचा इतिहास भाग – २ , नूतन प्रकाशन पुणे .
- गाढाळ डॉ . साहेबराव, (१९९८) आधुनिक भारताचा इतिहास , कैलाश पब्लिकेशन्स , औरंगाबाद
- नीलिमा सप्रे, पाटील प्रीती, (2006) शिक्षणातील विचारप्रवाह, नित्य नूतन प्रकाशन, कोल्हापूर
- दांडेकर, वा. ना. (१९८५), शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
- बापट, गा. भो. (१९८८), शैक्षणिक संशोधन, पुणे, नूतन प्रकाशन.
- भिंताडे, वि. रा. (१९९९), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन.
- मुळे, उमाठे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ.
- शैलजा भंगाळे, महाजन संगीता, (2015) माध्यमिक शिक्षणातील समकालीन संदर्भ व समस्या, प्रशांत प्रकाशन, जळगाव
- Anderson, Donald Dunuoody. (1966): A Comparison of Edward's Personal Preferences Schedule Patterns of Elementary School Teachers in Open and Closed Organizational Climates. Auburn University.

- Best, J.W. and Kahan J.V. (1998), Research in Education (7 th edition)
- Corporate Social and
- Choudhary, C.M. (1991): “Research Methodology”, New Delhi, RBSA Publishers.
- Dandekar, W.N. and Mahkija, S.(2011), Psychological Foundations of Education. Third Edition , India : Macmillan Publishers.
- George, Allen & Linwon, Olurir. (1960): “Research in Education”, London: Mac Millan Co.

संशोधक

अंकुश बाबासाहेब सिताराम

मार्गदर्शक

डॉ. गायकवाड गौतम रामचंद्र

प्राचार्य,

म.फुले अध्यापक महाविद्यालय, जळकोट

जि. लातूर